# शेतकऱ्यांना बळ देणारी जोडधंदा योजना

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे विविध असली तरी नापिकी हे प्रमुख कारण आहे. त्याला पर्याय म्हणून जोडधंद्याद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनात निश्चितच आशेची पालवी फुटू शकते. त्यासाठी पश्चिम महाराष्ट्राचे उदाहरण बोलके आहे. म्हणूनच विदर्भातील सहा जिल्ह्यांत आता जोडधंद्यासाठी विशेष योजना राबविली जात आहे.

**असं देणार बळीराजाला बळ**

- योजनेतील समाविष्ट जिल्हे : अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशीम आणि वर्धा.
- केंद्र शासनाकडून तीन वर्षांत उपलब्ध होणार १०४ कोटी. यापैकी ६ कोटी रुपये उपलब्ध
- शासनाचा वाटा ७५ टक्के तर लाभार्थाचा वाटा २५ टक्के.
- कोटी रुपयांच्या निधीचे वितरण.
- सहा जिल्ह्यांत लोकसंख्येच्या प्रमाणात निधी खर्च करणार.
- शेतकऱ्यांना गायी- म्हशी आणि शेळ्या- मेंढ्यांचे वाटप करणार.
- शेतकऱ्यांनी मागणी केल्यास या व्यतिरिक्त पुरक व्यवसायास सहाय्य.
- दूध संकलनासाठी वाहतूक, कॅन, दूध तपासणी सामुग्री आदी सुविधा देणार.
- प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या.
- पशुपक्षी पालनाचे शेतकऱ्यांना अद्ययावत प्रशिक्षण.
- यशस्वी दूध उत्पादकांच्या भेटी-गाठींसाठी शेतकऱ्यांच्या सहलींचे आयोजन.
- वासरांची जोपासना कार्यक्रम राबविणार.
- दुभत्या जनावरांसाठी आरोग्य सुविधा.
- खाद्य व वैरण पुरवठा कार्यक्रम राबविणार.

**पुरक व्यवसायांतून आम्ही साधू आत्मसन्मान**

**संकलन : जगदीश मोरे,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.